गा र नं ३८०/२०२४

त ३५ ९७१

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** पिंपळ गांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0126 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/05/2026 13:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 238 |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 62 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 15/05/2026

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/05/2026

**Time From (वेळेपासून):** 15:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/05/2026 **Time (वेळ):** 13:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/05/2026 13:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पिंपळगांव बसवंत पोलीस स्टेशन, निफाड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष रविंद्र पैलकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक,पिंपळ गांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक,पिंपळ गांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9823103102

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष राघो ब्राम्हणे | | | 1. पिंपळगांव बसवंत पोलीस स्टेशन,पिंपळ गांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक
ग्रामीण दिनांक:-16/05/2026

फिर्याद

मी संतोष रविंद्र पैलकर, वय 51 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, मोबाईल नंबर 9823103102
समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन सरकारतर्फे फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे गेल्या पावने दोन वर्षापासुन कार्यरत आहेत. दिनांक 13/05/2026 रोजी आम्ही कर्तव्यावर हजर असतांना मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी तक्रारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांचे तकारीप्रमाणे कारवाई करणेबाबत आदेशित केले. त्यांनतर आम्ही तकारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांची आमचे कार्यालयात भेट घेवून त्यांना त्यांचे तकारी बाबत विचारपुस केली असता, त्यांनी सांगितले की, "दिनांक 14/05/2026 रोजी पिंपळगांव (बसवंत) येथे या. मी तेथेच आपणांस आमची तकार लिहुन देतो" असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही दिनांक 14/05/2026 रोजी मा. उप आयुक्त (प्र), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना दोन कर्मचारी शासकीय पंच म्हणुन मिळणेकामी लेखी पत्र दिले. त्याप्रमाणे त्यांचे कार्यालयाकडील श्री. दत्तु हरी शेरे व श्री. अशोक हिरागीर गोसावी असे शासकिय पंच म्हणुन आमचे कक्षात 13:00वाजता हजर झाले. त्यावेळी आमचे कक्षात आम्ही, सापळा पथकातील पोलीस हवालदार गणेश निंबाळकर व पोलीस हवालदार प्रमोद चव्हाणके असे उपस्थित होतो. त्यावेळी आम्ही आमची ओळख करून देवून सापळा पथकातील सदस्यांची व पंचांची आपसात ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य शासकीय वाहन क्रमांक एम एच 15 जे एस 3092मध्ये सापळा पथकाचे हस्ते ठेवून आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयातुन 13:15 वाजता शासकीय वाहन कमांक एम एच 15 जे एस 3092 ने निघुन आमचेत व तक्रारदार यांचेत फोनव्दारे झालेल्या संभाषणाप्रमाणे नाशिक-ओझर मार्गे पिंपळगांव (बसवंत) येथील जोपुळ रस्त्यावरील मा. शरदचंद्र पवार कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील रूचा वजन काट्याजवळील तकारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांचा मावस भाऊ श्री. विकास कुशारे यांचे पञ्याचे कांदा शेड मध्ये 14:20 वाजता पोहचलो. तेथे तकारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यास आमचा, दोन्ही पंचांचा व सापळा पथकातील सदस्यांच्या परिचय करून देवुन तकारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांना त्यांचे तक्रारी बाबत विचारपुस करता त्यांनी श्री. सचिन सुकदेव कुयटे, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती, राहणार:- मु. पो. दावचवाडी, ता. निफाड, जि. नाशिक असे सांगुन त्यांचे तकारीचा आशय दोन्ही पंचांसमक्ष आम्हास तोंडी सांगितला. त्यावरून आम्ही त्यांना त्याप्रमाणे तकार लिहुन देण्यास सांगितली असता श्री. सचिन कुयटे यांनी त्यांचे स्वःहस्ताक्षरात तकार लिहुन दिली ती खालीलप्रमाणे.

" मी वरील ठिकाणी माझे कुटुंबीयांसह राहत असुन मी शेती करून माझे कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करतो. दिनांक 08/05/2026 रोजी माझे चुलते दत्तात्रय विश्वनाथ कुयटे व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांचे उत्तम संपतराव कुयटे यांचेशी शेतातील रस्त्याच्या येण्या-जाण्याचे वहिवाटीवरून भांडण झाले होते. त्यावेळी मी व माझे वडील सुकदेव कुयटे असे दोघे जण त्यांचे भांडण मिटविण्यासाठी गेलो होतो. त्यामुळे माझे चुलते दत्तात्रय विश्वनाथ कुयटे यांनी उत्तम संपतराव कुयटे यांचेविरूध्द पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे अदखलपात्र तकार दिली होती. तसेच उत्तम संपतराव कुयटे यांनी मी, माझे वडील सुकदेव कुयटे, माझे चुलते दत्तात्रय कुयटे व त्यांचे कुटुंबातील सदस्य अशांचे विरूध्द पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे तकार अर्ज दिला होता.

त्या तकार अर्जाची चौकशी पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीणचे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे हे करीत आहे. सदर तक्रार अर्जाच्या चौकशी करीता पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे व पोलीस शिपाई प्रशांत उगले हे दिनांक 11/05/2026 रोजी आमचे दावचवाडी येथील शेतात आले होते. त्यावेळी त्यांनी आम्हा सर्वांना 'उत्तम कुयटे यांची तुमच्या विरूध्द गंभीर स्वरूपाची तकार घेतलीनाही, साधा तकार अर्ज घेतला आहे, तुम्हाला सर्वांना अर्ज चौकशीत मदत करतो व तुमचेविरूध्द कोणतीही कारवाई करीत नाही असे सांगुन आम्हाला सर्वांना पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे येण्यास सांगितले होते. परंतु आम्हाला आमच्या शेती कामामुळे पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे जाण्यास जमले नाही. त्यानंतर दिनांक 12/05/2026 रोजी 16:04 वाजता (सायंकाळी 04:04वाजता) पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीणचे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी त्यांचा मोबाईल नंबर 9552536336 च्या व्हॉटस्अॅप वरून माझा मोबाईल नंबर 9370342014 च्या व्हॉटस्अॅपवर कॉल करून मला, 'तुम्ही पोलीस स्टेशनला का आले नाही' अशी विचारणा केली असता मी त्यांना आमचे शेती काम चालु आहे, एक दोन दिवसांत पोलीस स्टेशनला येतो असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला, 'तमुच्या विरूध्द उत्तम कुयटे यांची गंभीर स्वरूपाची तक्रार घेतली नाही, साधा तकार अर्ज घेतला आहे, तुम्हाला सर्वांना अर्ज चौकशीत मदत करतो व तुमचेविरूध्द कोणतीही कारवाई करीत नाही' असे सांगुन माझेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना एक दोन दिवसांत पोलीस स्टेशनला येतो असे सांगितले असता त्यांनी येतांना 5,000/- रूपये घेवून ये असे मला सांगितले.
मी आज दिनांक 14/05/2026 रोजी पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीणचे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना भेटण्यासाठी पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे जाणार असुन त्यावेळी ते माझ्याकडे लाचेची मागणी करतील व मी त्यांना लाच न दिल्यास ते आम्हाला अर्ज चौकशीत मदत करणार नाही तसेच आमचेविरूध्द उत्तम कुयटे यांची गंभीर स्वरूपाची तक्रार घेवून कारवाई करतील. मला, पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीणचे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझ्यात आणि पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार नसुन कोणतेही वैर अथवा वैमनस्य नाही. तरी सदरबाबत पडताळणी करून त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणेस विनंती आहे." वरीलप्रमाणे तकार लिहुन दिल्यानंतर तक्रारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांनी त्यावर सही केली. त्यानंतर त्यावर आम्ही व दोन्ही पचांनी समक्ष म्हणुन सही केली. तकारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचे तकारी प्रमाणे लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे हे तकारदार यांचेकडे त्यांनी केलेल्या तकारीप्रमाणे खरोखर लाचेची मागणी करतात अगर कसे ? याबाबत पडताळणीकामी पंच नं. 1 श्री. दत्तु शेरे यांचेसह तकारदार नामे श्री. सचिन कुयटे यांना लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांच्या भेटीकरीता पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे पाठवायचे असल्याने त्यांना आम्ही तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांना सुचना दिल्या की, आपण पंच नं. 1 श्री. दत्तु शेरे यांचेसह आपलेकडील फोर व्हिलर कारने पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे जावुन लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांची भेट घ्यावी व तुमचे कामासंबंधी बोलणी करावी. तसेच पंच नं. 1 श्री. दत्तु शेरे यांचे बाबत विचारल्यास ते तुमचे नातेवाईक असल्याचे सांगावे. दरम्यान लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी केल्यास थोडासा अवधी मागून घ्यावा व लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांची भेट न झाल्यास अथवा त्यांनी पैशांची मागणी न केल्यास पुन्हा आम्ही थांबलेल्या ठिकाणी मा. शरदचंद्र पवार कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील रूचा वजन काट्याजवळील श्री. विकास कुशारे यांचे पत्र्याचे कांदा शेड मध्ये येण्याबाबत योग्य त्या सुचना दिल्यात. त्यानंतर पंच नं. 1 श्री. दत्तु शेरे यांना आम्ही तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचे बरोबर जावून तक्रारदार व लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांचेत होणारे संभाषण बारकाईने ऐकावे. तसेच त्यांचे हालचालींवर लक्ष ठेवणे बाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणीकामी पंच नं. 1 श्री. दत्तु हरी शेरे यांचेसह तकारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून ते काळे रंगाचे पाऊचमध्ये ठेवुन तकारदार यांचे शर्टाचे आत असलेल्या बनियानच्या आतील बाजुस सेफ्टि पिनच्या सहाय्याने लावले व लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांच्या भेटीकरीता पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिकग्रामीण येथे त्यांचेकडील हयुंदाई कंपनीची आय व्टेन्टी कार कमांक एम एच 04 जे एम 6342 ने रवाना केले. ती वेळ 17:24 वाजेची होती. त्यानंतर काही वेळाने तकारदार नामे श्री. सचिन कुयटे व पंच नं. 1 श्री. दत्तु शेरे हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडुन व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. ती वेळ 19:14वाजेचे होती. तकारदार नामे श्री. सचिन कुयटे यांची लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांचेशी पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे भेट झाली असुन त्यांचेमध्ये झालेल्या महत्वाच्या संभाषणा दरम्यान लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे याने तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांना " अं माझ काय हे भो माझाच कामाचा एवढा घोळ हे सध्या माझी



Scanned with CamScanner

पुर्तता नही होवू राहिली त्याला कुड सांगु मी बरोबर हे का नही" असे म्हणुन मला तुमच्याकडुन आजपर्यंत पैसे मिळाले नाही असे सांगितले. त्यावर तकारदार नामे श्री. सचिन कुयटे हे लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना " किती काय मंग" असे म्हणुन लाचेची किती रक्कम दयावी लागेल बाबत विचारणा केली असता त्यावर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तकारदार नामे कुयटे यांना "भाऊ तुझ्या पध्दतीने तुला काय करायचं करून टाक तुला काहीच म्हणणार नही सांगतला ना, तु परिचयाचा आहे तुला काय सांगायची गरज आहे का" असे म्हणुन तु परिचयाचा असल्याने तु एक विशिष्ट रक्कम लाच म्हणुन देवून टाक असे सांगितले. यानंतर तक्रारदार नामे कुयटे हे लोकसेवक नामे ब्राम्हणे यांना " हा मी काय म्हणतो ते बाकीच जाऊदया आता ते संबंध काय हे एक बोला म्हणजे मंग माला पुढं जायला" असे म्हणुन निश्चित लाचेची किती रक्कम दयावी लागेल बाबत विचारणा केली असता त्यावर लोकसेवक ब्राम्हणे याने तकारदार नामे कुयटे यांना " नही तुझ्या पध्दत्तीने तुला जे योग्य वाटल ते " असे म्हणुन तु एक विशिष्ट रक्कम लाच म्हणुन देवून टाक असे सांगितले. त्यानंतर पुन्हा तकारदार नामे कुयटे हे लोकसेवक नामे ब्राम्हणे यांना " हा पण मंग किती काय मोकळं सांगुन दया" असे म्हणुन पुन्हा निश्चित लाचेची किती रक्कम दयावी लागेल बाबत विचारणा केली असता त्यावर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तक्रारदार नामे कुयटे यांना " तुझ्या पध्दत्तीने तुला काय" असे म्हणुन पुन्हा तु एक विशिष्ट रक्कम लाच म्हणुन देवून टाक असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार नामे कुयटे हे लोकसेवक नामे ब्राम्हणे यांना " माझ्या पध्दतीने नहीं एक शब्द बोलुन टाका हे बघा उगले दादा नाराज नको साहेब बीयेब तुम्ही तुमचे तुम्ही असे म्हणाले. त्यावर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तकारदार नामे क्यटे यांना "साहेब अन उगले तिकड माझा काही संबंध राहणार नही" असे म्हणाले. त्यावर तकारदार नामे कुयटे हे लोकसेवक नामे ब्राम्हणे यांना " त्यांना नही भेटणार मी त्यांना " असे म्हणाले. त्यावर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तक्रारदार नामे कुयटे यांना कोणला " असे म्हणाले. त्यावर तक्रारदार नामे कुयटे हे लोकसेवक नामे ब्राम्हणे यांना " त्यानला कशाला जाऊ मी भेटायला" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तक्रारदार नामे कुयटे यांना " नही नही माझ्या पध्दत्तीने देईल मी त्यांना" असे म्हणुन तुम्ही लाचेची रक्कम दिल्यानंतर पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व पोलीस शिपाई प्रशा  शिपाई प्रशांत उगले यांना भेटण्याची आवश्यकता नाही असे सांगितले. त्यानंतर पोलीस ब्राम्हणे याने तकारदार नामे कुयटे यांना "बघा तुमच्या पध्दत्तीने काही नहीं नही आपला काही विषय नही पीआय सर आणि त्याचा विषय बाकी नही काही अं हो हो" असे म्हणुन पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचा प्रभाव तकारदार कुयटे यांचेवर पाडुन लाचेच्या रक्कमेची मागणी करीत आहे. त्यानंतर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तक्रारदार नामे कुयटे यांना " हा जावु दया मंग त्याला नही सांग त्याला तो माला पाच हजार सांगत होता" असे म्हणुन तकारदार यांचेकडे पाच हजार रूपयेच्या लाचेची मागणी केली. त्यावर तकारदार नामे कुयटे यांनी लाचेच्या रक्कमेची खात्री होण्यासाठी लोकसेवक नामे ब्राम्हणे यांना " किती पाच हजार " असे म्हणुन पाच हजार रूपये लाच म्हणुन दयायचे का बाबत विचारणा केली असता त्यावर लोकसेवक नामे ब्राम्हणे याने तक्रारदार नामे कुयटे यांना "हं" असे म्हणुन पाच हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार नामे कुयटे यांनी लोकसेवक नामे ब्राम्हणे यास "बर ठिक हे देतो चला पाच हजार असे म्हणुन तुम्हाला पाच हजार रूपये लाच म्हणुन देतो असे म्हणुन तक्रारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे यांचेकडे लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी तक्रारदार, त्यांचे वडील सुकदेव कुयटे, त्यांचे 13चुलते दत्तात्रय कुयटे व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांचेविरूध्द त्यांचेकडे चालु असलेल्या अर्जचौकशीत मदत करून त्यांचेविरूध्द कोणतीही कारवाई न करण्याचे मोबदल्यात 5,000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे.? तसेच तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांना तात्काळ काही वेळात मागणी केलेली लाचेची रक्कम घेवून पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे बोलविले असल्याने तकारदार यांचेकडे लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता तकारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे यांनी आमचे व दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना लाच म्हणुन देण्यासाठी 5,000/- रूपये (पाच हजार रूपये) त्यात 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा हजर केल्या. त्यानंतर पोलीस हवालदार प्रमोद चव्हाणके यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या चलनी नोटांचे नंबर पोलीस हवालदार गणेश निंबाळकर यांचे मदतीने कागदावर लिहुन सदर कागदावर आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या असुन सापळा कारवाईत नोटांना अँथ्रासिन पावडर कशी लावली जाते, त्यांच्या गुणधर्मा बाबतची माहिती व त्यांचे प्रत्याक्षिक आमचे सुचनेवरुन पोलीस हवालदार प्रमोद चव्हाणके यांनी करुन दाखविले. त्यानंतर तकारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचेकडे लाचेची रक्कम देवून त्यांना पंच नं. 1 श्री. दत्तु हरी शेरे यांचेसह तकारदार यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून ते काळे रंगाचे पाऊचमध्ये ठेवुन तकारदार यांचे शर्टाचे आत असलेल्या बनियानच्या आतील बाजुस सेफ्टि पिनच्या सहाय्याने लावले व लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना लाचेची रक्कम देण्याकरीता भेटीकरीता पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे त्यांचेकडील हयुंदाई

पोलिस निरीक्षक

Scanned with CamScanner

कंपनीची आय व्हेन्टी कार कमांक एम एच 04 जे एम 6342 ने रवाना केले. ती वेळ 21:12 वाजेची होती. तकारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे हे त्यांचेकडील फोर व्हिलर कारने ठरल्याप्रमाणे पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे जात असतांना तक्रारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांचे मोबाईल फोनवर संपर्क साधुन त्यांचा मोबाईल फोनचा आवाज लाऊडस्पिकरवर टाकुन त्यांचेशी संभाषण केले असता लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी आज पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे येण्यास मनाई करून नंतर भेटण्यास बोलाविले असल्याचे सांगितल्याने आम्ही तक्रारदार यांचेकडून व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. ती वेळ 21:32 वाजेची होती. त्यानंतर सदरील कारवाई तकारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांच्या विनंतीवरुन तात्पुरती स्थगित करण्यात आली. वरील नमुद अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या 5,000/-रूपये (पाच हजार रूपये) त्यात 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा एका पाकिटात टाकुन सदर पाकीट चिटकवून सिलबंद करण्यात आले. त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहे. सदर पाकीट आम्ही ताब्यात घेतले आहे. त्याबाबत सविस्तर लाच मागणी पडताळणी व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 15/05/2026 रोजी आम्ही सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य शासकीय वाहन कमांक एम एच 15 जे एस 3092 मध्ये सापळा पथकाचे हस्ते ठेवून आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयातुन 11:00 वाजता शासकीय वाहन क्रमांक एम एच 15 जे एस 3092 ने निघुन आमचेत व तक्रारदार यांचेत फोनव्दारे झालेल्या संभाषणाप्रमाणे नाशिक-ओझर मार्गे पिंपळगांव (बसवंत) येथील जोपुळ रस्त्यावरील मा. शरदचंद्र पवार कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील रूचा वजन काट्याजवळील तक्रारदार श्री. सचिन सुकदेव कुयटे यांचा मावस भाऊ श्री. विकास कुशारे यांचे पत्र्याचे कांदा शेड मध्ये 11:50 वाजता पोहचलो. त्यानंतर दिनांक 14/05/2026 रोजीच्या सापळापुर्व कारवाई दरम्यान अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या रक्कमेचे सिलबंद पाकीट आम्ही दोन्ही पंचासमक्ष पोलिस हवालदार प्रमोद चव्हाणके यांना उघडण्यास सांगितले असता पोलिस हवालदार प्रमोद चव्हाणके यांनी सदरील सिलबंद पाकिट उघडले असता त्यात दिनांक 14/05/2026 रोजी सिलबंद केलेल्या 5,000/- रूपये (पाच हजार रूपये) त्यात 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा असल्याचे दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचेकडे लाचेची रक्कम देवून त्यांना पंच नं. 1 श्री. दत्तु हरी शेरेयांचेसह तकारदार यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून ते काळे रंगाचे पाऊचमध्ये ठेवुन तकारदार यांचे शर्टचे आत असलेल्या बनियानच्या आतील बाजुस सेफ्टि पिनच्या सहाय्याने लावले व लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना लाचेची रक्कम देण्याकरीता भेटीकरीता पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे त्यांचेकडील हयुंदाई कंपनीची आय व्हेन्टी कार क्रमांक एम एच04जे एम 6342 ने रवाना केले. ती वेळ 13:09 वाजेची होती. त्यानंतर त्यांचे पाठोपाठ आम्ही, सापळा पथक व पंच नं. 2 श्री. अशोक हिरागीर गोसावी असे शासकिय वाहनाने पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे जात असतांना आम्ही, सापळा पथक व पंच नं. 2 श्री. अशोक हिरागीर गोसावी असे पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण पासुन अलीकडे काही अंतरावर उतरून घेवून तेथुन पायी पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे जाऊन पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या परिसरात असलेल्या दत्त मंदिराचे सभा मंडपातील नागरीकांमध्ये मिसळुन राहुन सापळा आयोजित केला. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांनी लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी पैसे स्विकारल्यानंतर तकारदार यांनी करावयाचा ठरलेला नियोजित इशारा न करता आमचे मोबाईल फोनवर फोन केला असता आम्ही सदरचा फोन कट करून त्यांना व्हॉटस्अँपवर मेसेज करणेबाबत व्हॉटस्अँप मेसेज व्दारे कळवुन तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचा मोबाईल नंबर 9370342014 च्या व्हॉटस्अँपवर 'घेतले का??' असा व्हॉटस्अँप मेसेज पाठविला असता त्यांनी "हो" असा मेसेज पाठविल्याने आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यास ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडून व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. ती वेळ 15:46 वाजेची होती. त्यांनतर आम्ही त्यांना आमची व सापळा पथकाची ओळख करुन देवुन त्यांना त्यांचे नाव, गाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नांव संतोष राघो ब्राम्हणे, वय- 44वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस हवालदार बक्कल नंबर 1361, नेमणुक पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण राहणारः- प्लॉट नंबर 25, स्वप्नपुर्ती बंगलो, नंदनवन कॉलनी, शरयु पार्क-2, कदम मळा, आडगांव शिवार, नाशिक असे सांगितले. त्यावेळी त्यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत कारवाई झाल्याचे सांगितले. त्यांनतर लाचेच्या रक्कमे बाबत लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांना विचारणा केली असता त्यांनी लाचेच्या रक्कमेबाबत काही एक सांगितले नाही. तसेच तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांना लाचेची रक्कम कोठे स्विकारली याबाबत विचारणा केली असता त्यांनी, लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी पंच नं. 1 श्री. दत्तु हरी शेरे यांना हाताचे इशा-याने बाहेर



Scanned with CamScanner

थांबण्यास सांगुन मला पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन मधील पुरूष लॉकअप जवळील स्वच्छता गृहाचे समोर घेवून जाऊन तेथे लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली असल्याचे सांगितले. तसेच सदरची लाचेची रक्कम मी आपणास व्हॉटस्ॲपव्दारे मेसेज करण्याचे तीन ते चार मिनीटांपुर्वी लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी माझेकडुन उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या सरकारी गणवेशावरील पॅन्टच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवुन लाचेची रक्कम स्विकारून ते वेगाने पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या उत्तर दिशेस लागुन असलेल्या पोली नाशिकस वसाहतीकडे निघुन गेले व लगेच पुन्हा पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या आवारात आले. यावरून लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचेकडुन लाचेची रक्कम 15:41 वाजता स्विकारली आहे. त्यामुळे तक्रारदार नामे श्री. सचिन कुयटे यांचेकडुन लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ते पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या उत्तर दिशेस लागुन असलेल्या पोलीस वसाहतीकडे गेल्याने आम्ही, दोन्ही पंचांसह लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यास पोलीस वसाहतीकडे घेवून जाऊन लाचेच्या रक्कमेचा शोध घेतला. त्याचप्रमाणे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यांच्या ताब्यातील पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या उत्तर दिशेस लागुन असलेल्या पोलीस वसाहतीमधील लाईन नंबर 4, रूम नंबर 15 च्या कुलुपास पुढील घरझडतीचे अनुषंगाने आमचे व दोन्ही पंचांचे सिल लावले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंचांसमक्ष लोकसेवक नामे पोलीस हवालदार संतोष ब्राम्हणे यास विश्वासात घेवून लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी लाचेचीरक्कम त्यांच्या ताब्यातील पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या उत्तर दिशेस लागुन असलेल्या पोलीस वसाहतीमधील लाईन नंबर 4, रूम नंबर 15 मध्ये ठेवले असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही, पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनच्या उत्तर दिशेस लागुन असलेल्या पोलीस वसाहतीमधील लाईन नंबर 4, रूम नंबर 15 ची झडती घेणेबाबत श्रीमती रूपाली खांडवी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांना प्राधिकार पत्र दिल्याने त्यांनी दोन शासकिय पंचांसमक्ष झडती घेतली असता त्यांना लाचेच्या 5,000/- रूपये (पाच हजार रूपये) त्यात 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा मिळुन आल्या आहेत. सदर बाबत यशस्वी सापळा कारवाई पंचनामा करण्यात आला आहे. तरी तक्रारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे, त्यांचे वडील सुकदेव कुयटे, त्यांचे चुलते दत्तात्रय कुयटे व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांचेविरूध्दची अर्जचौकशी आरोपी लोकसेवक नामे पोहवा1361 संतोष राघो ब्राम्हणे यांचेकडे चालु होती. सदर अर्जचौकशीत पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचा प्रभाव तकारदार श्री. सचिन कुयटे यांचेवर पाडुन तक्रारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे, त्यांचे वडील सुकदेव कुयटे, त्यांचे चुलते दत्तात्रय कुयटे व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांना अर्जचौकशीत मदत करून त्यांचेविरूध्द कोणतीही कारवाई न करण्याचे मोबदल्यात स्वतःसाठी आरोपी लोकसेवक नामे पोहवा 1361 संतोष राघो ब्राम्हणे यांनी दिनांक 14052026 रोजी तकारदार नामे श्री. सचिन सुकदेव कुयटे, यांचेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी करून आरोपी लोकसेवक नामे पोहवा /1361 संतोष राघो ब्राम्हणे यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली 5,000/- रूपये लाचेची रक्कम दिनांक 15/05/2026 रोजी 15:41 वाजता स्विकारली आहे. तसेच आरोपी लोकसेवक नामे पोहवा/1361 संतोष राघो ब्राम्हणे यांनी तक्रारदार श्री. सचिन कुयटे यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सदर लाच रक्कम गुन्हयातील महत्वाचा पुरावा असल्याचे त्यास माहित असुन देखील त्यांनी सदर लाच रक्कमेबाबत कोणतीही माहिती तात्काळ घटनास्थळावरती न देता पुरावा नाहीसा करण्याच्या इरादयाने लपविण्याचा प्रयत्न केला आहे म्हणुन माझी लोकसेवक नामे संतोष राघो ब्राम्हणे, पोलीस हवालदार बक्कल नंबर 1361, नेमणुक पिंपळगांव (बसवंत) पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7 अ सह भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 238, 62प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

**माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.**

**सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक रुपाली रामु खांडवी**

**नेमणूक-लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, मोबा क्र.8379961020 हे करत आहे.**

**समक्ष** **ही फिर्याद दिली.**

पोलीस निरीक्षक
पिंपळगाव (ब.) पो.ठाणे, नाशिक ग्रा.

Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pradeep balasaheb deshmukh(I (Inspector)) / pi **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** pradeep balasaheb
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

दि.१६/०५/२०२६ रोजी पाठविले

(चंद्रकांत [illegible])
पो हवा. ब.नं ७७९

पोलीस ठाणे अंमलदार
पिंपळगांव (ब.), पोलीस ठाणे
नाशिक ग्रामिण

पोलिस निरीक्षक
पिंपळगांव (ब.),पो.ठाणे, नाशिक ग्रा.

Scanned with CamScanner